# खारफुटीतला खजिना



संदीप शिंदे, ठाणे

खारफुटी म्हणजे बिनकामाची झुडपं, खारफुटी म्हणजे दलदल, खारफुटी म्हणजे प्लास्टिकच्या पिशव्यांचा खच, खारफुटी म्हणजे सर्वत्र घाण... मानवी अतिक्रमणांमुळे सर्वसामान्यांसमोर खारफुटीचे हे असं गलिच्छ चित्रं उभं राहतं.



मात्र, प्रत्यक्षात खारफुटीच्या जंगलाची सैर म्हणजे एक अवर्णनीय आनंद असतो. पर्यावरणप्रेमींसाठी तर खारफुटी म्हणजे भूलोकीवरचा स्वर्गच. हा स्वर्गीय आनंद मुंबईतही अनुभवता येऊ शकतो, असं सांगितलं तर अनेकांना खरं वाटणार नाही. मात्र, विक्रोळीच्या गोदरेज कंपनीच्या आवारातील सुमारे पावणेदोन हजार एकर जागेत नैसर्गिक चमत्कार आणि जैविक साधनसंपत्तीने काठोकाठ भरलेलं खारफुटींचं जंगल उभं आहे.

पाण्याबाहेरच्या चिखलातही श्वासोच्छ्वास करू शकणारा निवटी मासा, एक नांगी असलेला फिडलर खेकडा, डोक्यावर काळी टोपी असलेला ब्लॅक हेडेड सीगल, प्रचंड वेगात उडणारे स्विस्ट आणि सिसलेट पक्षी, राजेशाही डौल असलेली ब्राह्मणी घार, डोक्यापासून पाठीपोटापर्यंत पांढरा आणि पंख विटकरी असलेला इम्पीरिअल ईगल, पांढऱ्या पोटाचा समुद्री गरुड, असंख्य बुलबुल आणि तब्बल २०७ प्रकारचे पक्षी, सुळे असलेले डुक्कर, मुंगुस, साप, अजगर, मण्यार, घोणस अशी प्राणीपक्ष्यांची खाण या खारफुटीच्या जंगलात वास्तव्याला आहे. अगदी कोल्हेही या जंगलात आहे. मिस्वाक टुथपेस्ट ज्या पानांपासून तयार केली जाते ते मिस्वाकचं झाडही इथे आहे. तीन पर्णिकांचे एक पान असलेले कॉमन डेरिफ वेल, काटेरी पान असलेले मारंडी, सरपटणारा क्रिपर वेल, १० फूट उंच वाढणारं एलिफंट ग्रास अशी



परिपूर्ण इकोसिस्टम इथे पाहायला मिळते. खारफुटीच्या झाडांचे अनेक प्रकारही इथे आहेत.

सरकारला खारफुटींच्या जंगलांचं महत्त्व पटण्यापूर्वीपासून म्हणजे अगदी १९४०पासून गोदरेज कंपनीचे मालक आणि मॅनेजमेण्ट मोठ्या आस्थेने या खारफुटीचं रक्षण आणि संवर्धन करत आहे. १९८५ साली इथे सुनाबाई पिरोज शा गोदरेज मरिन इकॉलॉजी सेण्टरची कंपनीने स्थापना झाली. या सेण्टरच्या माध्यमातून खारफुटींचं महत्त्व आणि त्याबाबतची जागरूकता वाढवण्यासाठी प्रयत्न केले जातात. शाळा, कॉलेज, एनजीओ आणि पर्यावरणप्रेमींच्या स्टडी टूरही इथे विनामूल्य आयोजित केल्या जातात. प्रकल्पप्रमुख डॉ. माया महाजन आणि हेमंत कारखानीस या दोघांकडे या विभागाचा चार्ज आहे. चार तासांच्या या स्टडी टूरमध्ये खारफुटीचं जंगल आपल्याला अक्षरश: वेड लावतं. आऊटडोअर सेशनमध्ये प्राणीपक्षांच्या प्रत्यक्ष निरीक्षणासह त्यांची परिपूर्ण माहिती दिली जाते. इथे उभारलेले मरीन ॲक्वेरियम ही तर पर्वणीच आहे. इथे एका टॉवरवरून या जंगलाचा संपूर्ण परिसर दृष्टीपथात येतो. तर इनडोअर सेशनमध्ये पोस्टर प्रेझेण्टेशन, ऑडिओ व्हिज्युअल प्रेझेण्टेशन, स्लाइड शो आणि डॉक्युमेण्टरीजद्वारे या खारफुटींचं आणि इको सिस्टमचं महत्त्व सांगितलं जातं. सेण्टरच्या पूर्वपरवानगीशिवाय जंगलात कुणीही शिरू शकत नाही. तिथे जाण्यासाठी सेण्टरच्या ६७९६२०७७ या क्रमांकावर,



तसंच माया महाजन (९८२०६१८८६५) किंवा हेमंत कारखानीस (९८१९७०५४८५) यांच्याशी संपर्क साधता येईल. तसंच, maya@godrej.com किंवा hvk@godrej.com वर ई-मेल करावा.

sandeep.shinde@timesgroup.com